## मूल येथे शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १० जानेवारी :** मुल येथे नवीन शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय व्हावे, यासाठी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांनी पाठपुरावा करून हा विषय लावून धरला. आता लवकरच हा विषय मंत्रिमंडळाच्या बैठकीत येणार आहे. त्यामुळे आ. श्री. मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. वाघांचा जिल्हा म्हणून नावलौकिक असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी आधुनिक शिक्षण घ्यावे. जिल्ह्याचा नावलौकिक देशात वाढवावा.

## कोषागार कार्यालयात निवृत्तीधारकांचा मेळावा

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १० जानेवारी :**निवृत्तीवेतनाबाबत निवृत्ती वेतनधारकांच्या शंका, समस्या व सूचना जाणून त्यांचे निराकरण करण्यासाठी नागपूर महालेखाकार कार्यालयाच्या निर्देशानुसार चंद्रपूर जिल्हा कोषागार कार्यालयात निवृत्तीवेतन धारकांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी नागपूर महालेखाकार कार्यालयाचे वरिष्ठ लेखाधिकारी राजेश सांगोडे, सहायक लेखाधिकारी चंद्रप्रकाश, जिल्हा कोषागार अधिकारी सुहास पवार, अपर कोषागार अधिकारी (निवृत्तीवेतन शाखा) राजश्री सेलूकर, संजय पडिशालवार, संतोष फुलझेले, वरिष्ठ लेखापाल बालबिहारी प्रजापती आदि उपस्थित होते.

# कर्मवीर दादासाहेबांचे विचार आणि कार्य पुढच्या पिढीपर्यंत पोहचवा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : कर्मवीर मा.सा. कन्नमवार शतकोत्तर रौप्य महोत्सवी सोहळा




**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १० :** तुलनेने अतिशय मागास असलेल्या कष्टकरी समाजात दादासाहेब कन्नमवार यांनी जन्म घेतला, मात्र स्वत:च्या मेहनतीवर त्यांनी आपले कर्तृत्व सिध्द केले. दादासाहेब हे ध्येयवादी नेते होते. राज्याचा आणि जिल्ह्याच्या विकासाचा ध्यास घेऊन ते संपूर्ण जीवन जगले. अशा नेत्यांचे विचार आणि कार्य पुढच्या पिढीपर्यंत पोहचविणे गरजेचे आहे, असे मनोगत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

प्रियदर्शनी इंदिरा गांधी सभागृह येथे बेलदार समाज संघटना व रौप्य महोत्सव समितीच्या वतीने आयोजित कर्मवीर मा.सा. कन्नमवार शतकोत्तर रौप्य महोत्सवी सोहळ्यात मुख्यमंत्री ना. फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. विजय वडेट्टीवार तर प्रमुख पाहुणे राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार किशोर जोरगेवार, देवराव भोंगळे, सुधाकर अडबाले, माजी मंत्री शोभाताई फडणवीस, प्रभारी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, आयोजन समितीचे राहुल कन्नमवार, सुर्यकांत खनके आदी उपस्थित होते.

लोकनेते दादासाहेब कन्नमवारांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त आज येथे उपस्थित राहता आले, याचा अतिशय आनंद आहे, असे सांगून मुख्यमंत्री ना. फडणवीस म्हणाले, दादासाहेब यांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला होता. महात्मा गांधी आणि लोकमान्य टिळकांच्या विचारांचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता. भारत – चीन युध्दाच्या वेळी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांना देशाच्या संरक्षणमंत्री पदाची जबाबदारी देण्यात आल्यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून मा.सा. कन्नमवार यांनी राज्याची सुत्रे सांभाळली. या पदावर ते १ वर्ष ४ महिने होते. युध्दाचा तो काळ होता. अशा परिस्थितीत आर्थिक सहाय्य करण्यासाठी दादासाहेबांनी जनतेला आवाहन केले. त्याकाळात चंद्रपूर जिल्ह्याने तसेच महाराष्ट्राने त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत देशासाठी सोने-नाणे, आर्थिक मदत दान केली.

शिक्षण आणि आरोग्य हे अतिशय महत्वाचे विषय आहेत. प्रत्येक गावात आरोग्य केंद्र असावे, असा सर्वप्रथम विचार कर्मवीर दादासाहेबांनी मांडला. तसेच शिक्षणाच्या क्षेत्रातही त्यांनी अनेकांना प्रेरीत केले. या राज्याच्या प्रगतीसाठी अतिशय मोठे योगदान दादासाहेबांनी दिले आहे. विधानसभेच्या राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या वतीने कर्मवीर दादासाहेब कन्नमवार यांचा गौरवग्रंथ प्रकाशित करण्यात येईल.

पुढे मुख्यमंत्री ना. फडणवीस म्हणाले, सामान्य माणसांचा विकास करणे, हेच आपल्या सरकारचे सुध्दा ध्येय आहे. जिल्ह्याचा विकास करण्यासाठी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन काम करावे. त्यामुळे जिल्ह्याच्या संदर्भात सर्व अडचणी सोडविण्यात येईल. तसेच ज्या मागण्या करण्यात आल्या आहेत, त्यासुध्दा पूर्ण केल्या जातील, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

**मा.सा. कन्नमवार यांच्याकडे विकासाची दृष्टी :**

सर्वसाधारण कुटुंबात जन्म घेतलेल्या मा.सा. कन्नमवार यांनी आपल्या कर्तृत्वाने शिखर गाठले. कर्मवीर दादासाहेबांना विकासाची दृष्टी होती. कर्मवीर दादासाहेब कन्नमवार आणि देवेंद्र फडणवीस हे दोन मुख्यमंत्री चंद्रपूर जिल्ह्याने दिले आहे. अनेक बाबतीत दादासाहेब आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्यात साम्य असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सुध्दा दूरदृष्टीचे नेते आहेत. त्यांच्या पुढाकारातूनच समृध्दी महामार्गाचा विस्तार चंद्रपूर जिल्ह्यात होत आहे, असे आमदार किशोर जोरगेवार म्हणाले.

तसेच चंद्रपूर येथे होत असलेल्या नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि कॅन्सर रुग्णालयाकरीता १०० कोटींची आवश्यकता असून राज्य शासनाने सदर निधी द्यावा. जिल्ह्यातील धानोरा बॅरेज पूर्ण करावा. कर्मवीर मा.सा. कन्नमवार यांची जयंती शासकीय स्तरावर जाहीर करावी. तसेच चंद्रपूरात ४०० एकरवर २८७ कोटी रुपये खर्च करून होत असलेला टायगर सफारी प्रकल्प मार्गी लावावा, अशा मागण्यासुध्दा आमदार ना. जोरगेवार यांनी केल्या.

अध्यक्षीय भाषणात आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले, विहिरी आणि घरे बांधणाऱ्या कष्टकरी समाजातून आलेले दादासाहेब हे राज्याच्या सर्वोच्च पदी पोहचले. चंद्रपूर आणि गडचिरोली या दुर्गम जिल्ह्यात त्यांनी अनेक विकासकामांची पायाभरणी केली. चंद्रपूर येथे होत असलेल्या नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला कर्मवीर दादासाहेब कन्नमवार यांचे नाव द्यावे तसेच अल्प असलेल्या या समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ निर्माण करावे, अशी मागणी त्यांनी केले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते मा.सा. कन्नमवार गौरव स्मरणिकेचे विमोचन करण्यात आले. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणारे समाजातील डॉ. गजानन कोटेवार, प्रभा चिलखे, रुपेश कोकावार, देवराव कासटवार, गजानन चंदावार यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन ऐश्वर्या भालेराव यांनी केले.

### मुख्यमंत्र्यांनी घेतले माता महाकालीचे दर्शन

चंद्रपूर दौऱ्यादरम्यान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चंद्रपूरचे आराध्य दैवत माता महाकालीचे दर्शन घेतले व मंदिरात महाआरती केली. मंदिर विकासासंदर्भात बोलतांना मुख्यमंत्री म्हणाले, ठरविल्याप्रमाणे निश्चितपणे मंदिर परिसराच्या विकासाचे चांगले काम याठिकाणी होईल. तसेच पाठपुरावा करून मंदिर परिसर विकासाचा कार्यक्रम करण्यात येईल.

# चंद्रपूर जिल्हासह महाकाली मंदिर परिसराचा विकास करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## भारतीय जनता पार्टी आणि श्री महाकाली मता महोत्सव समितीच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १० :** मुख्यमंत्री झाल्या नंतर प्रथमच चंद्रपूर शहरात आलोय आणि या दौ-याची सुरवात माता महाकालीच्या दर्शनाने होणे हा शुभसंकेत आहे. काम करत असतांना शक्तीचा आर्शिवाद महत्वाचा आहे. मातेची ईच्छा असेल तर ठरविल्या पेक्षा मोठे काम इथे होणार, आपण पाठपूरावा करुन मंदिर परिसर विकासाचा कार्यक्रम पुर्ण करु असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मा. सां. कन्नमवार रौप्य महोत्सव कार्यक्रमा निमित्त राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज शुक्रवारी चंद्रपूर दौ-यावर होते. यावेळी भारतीय जनता पक्ष आणि श्री महाकाली माता महोत्सव समीतीच्या वतीने महाकाली मंदिर येथे मुख्यमंत्री यांच्या स्वागत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री यांनी माता महाकालीची आरती केली.

या कार्यक्रमाला आमदार किशोर जोरगेवार राष्ट्रीय इतर मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, आमदार देवराव भोंगळे, भारतीय जनता पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, महानगर अध्यक्ष राहुल पावडे, नेते खुशाल बोंडे, विजय राऊत, कल्याणी किशोर जोरगेवार, संध्याताई गुरनुले, महिला अध्यक्ष सविता कांबळे, संजय कंचर्लावार, रघुवीर अहिर, मनोज पाल, सुभाष कासनगोट्टूवार, युवा मोर्चा अध्यक्ष विशाल निंबाळकर, डॉ. मंगेश गुलवाडे, महामंत्री किरण बुटले, संदीप आवारी, विवेक बोडे, आदिंची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले कि, सामान्य मानसांचे जीवन सुखर होईल असे काम करण्याचा आशीर्वाद माता महाकालीला मागीतला आहे. महाराष्ट्र आणि सर्व समाज एकसंघ राहिला पाहिजे. समाजात काम करता असतांना शवेटचा माणूस डोळ्यासमोर राहिला पाहिजे. लाडक्या बहिणींचा आर्शिवाद




आम्हाला मिळाला त्यातुन ऊर्जा मिळत असल्याचेही ते यावेळी म्हणाले. यावेळी बोलतांना आमदार किशोर जोरगेवार म्हणाले कि, ५०० वर्ष जुने अस इथ महाकालीचे मंदिर आहे. छत्रपती शिवाजी महाराज कर्नाटकला जात असतांना त्यांनी माता महाकालीचे दर्शन घेतले असल्याचे ईतिहासात नमुद आहे. येथील परिसराराचा विकास करण्यासाठी २५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. हे काम आपण लवकर सुरु करण्याची मागणी त्यांनी यावेळी बोलतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली. आमंत्रण स्वीकारून आपण आल्या बदलही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले. आपल्या नेतृत्वात राज्यासह चंद्रपूर जिल्हाचा सर्वसमावेशक विकास होईल असा विश्वास यावेळी बोलतांना आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केला. आपण चंद्रपूरचे भुमिपूत्र आहात त्यामुळे अधिक अपेक्षा या जिल्हाच्या आपल्याकडून असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

# परिषदेच्या वतीने शिक्षकांचा चंद्रपुरात सत्कार

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १० :** महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग जिल्हा शाखा चंद्रपूरच्या वतीने चैतन्य ज्येष्ठ नागरिक मंडळ तुकूम चंद्रपूर येथे दिनदर्शिका विमोचन सोहळा, शिक्षक -सन्मान पुरस्कार सोहळा, सेवानिवृत्त शिक्षक संघटना पदाधिकारी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाचे टेलीकान्फर्सिंगद्वारे उद्घाटन आमदार देवराव भोंगळे यांनी केले तर अध्यक्षीय स्थान भाग्यश्री नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित नवरगावचे अध्यक्ष किशोर महालक्ष्मे यांनी भुषविले.

यावेळी प्रकाश चुनारकर राज्य कार्याध्यक्ष मराशिपप्रा, मधुकर मुप्पीडवार उपाध्यक्ष, रामदास गिरटकर संघटनमंत्री मराशिप नागपूर विभाग, विलास बोबडे कार्यवाह प्राथमिक नागपूर विभाग, विलास खोंड जिल्हाध्यक्ष मराशिप,दिलीप मॅकलवार जिल्हा कार्यवाह मराशिप, अमोल देठे जिल्हाध्यक्ष, विलास खाडे जिल्हा कार्यवाह, संजय लांडे जिल्हा कार्यकारी अध्यक्ष,अजय बेदरे जिल्हा कोषाध्यक्ष मराशिपप्रा उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन पाहुण्यांनी दीपप्रज्वलन करून केले. सिद्धी प्रकाश चुनारकर यांचे स्वागत नृत्याने उपस्थित भारावून गेलेत. सभागृहात टाकलेली रांगोळी लक्षवेधी ठरली.

आमदार देवराव भोंगळे यांनी टेलीकान्फर्सिंगद्वारे उपस्थित शिक्षक बांधवांशी संवाद साधून शिक्षक परिषद करीत असलेल्या कार्याचा गुणगौरव करून प्राथमिक शिक्षकांच्या पाठीशी सदैव उपस्थित राहण्याची ग्वाही दिली.शिक्षक हा पिढी घडविणारा असल्याने त्याच्यावर फार मोठी जबाबदारी असल्याचे त्यांनी पुढे म्हटले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष किशोर महालक्ष्मे यांनी शिक्षक हा समाजाचा आधारस्तंभ असून आजच्या नविन पिढीला संस्कारित करण्याची जबाबदारी शिक्षकांवर येऊन पडली असल्याचे म्हटले. भारतात गुरूची फार मोठी परंपरा असून प्राचीन गुरूंचा त्यांनी नामोल्लेख करून शिक्षकांवर फार मोठी जबाबदारी असल्याचे प्रतिपादन केले.

प्रमुख मार्गदर्शक प्रकाश चुनारकर यांनी परिषदेच्या एकूण वाटचालीविषयीचा उहापोह आपल्या भाषणात करून शिक्षक परिषदेने केलेल्या कार्याचा नामोल्लेख केला.शिक्षक परिषद नेहमी शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी तत्पर असल्याचे आपल्या भाषणात पुढे म्हटले.

मधुकर मुप्पीडवार यांनी प्राथमिक विभाग करीत असलेल्या कार्याचा याप्रसंगी गुणगौरव केला. प्राथमिक विभागाने सुरू केलेले कार्य आज राज्यव्यापी बनले असून प्रकाश चुनारकर यांचे योगदानाबद्दल प्रशंसा केली.


**मध्य रेल्वे**

**कमाईच्या करारासाठी ई-लिलाव (पार्किंग आणि वेतन आणि शौचालय वापरा)**

एनजीपी/सीडब्ल्यू/६९३/पे आणि पार्क/ई-लिलाव

नागपूर विभागातील पार्किंग आणि पे अँड यूज टॉयलेट कॉन्ट्रॅक्टसाठी ई-लिलाव खालीलप्रमाणे मागविण्यात आले आहेत. कॅटलॉग १. पार्किंग-एनजीपी-डब्ल्यूआर-एफडब्ल्यू-४९-२२-३ आरंभ २७/०१/२०२५ रोजी १५.०० वाजता / २७/०१/२०२५ रोजी १५.३० वाजता समाप्त. २. पार्किंग-एनजीपी-बीएक्सव्हाय-एमएक्स-६४-२४-१ आरंभ २७/०१/२०२५ रोजी १५.०० वाजता./ २७/०१/२०२५ रोजी १५.४० वाजता समाप्त. ३. पार्किंग-एनजीपी-एसईजीएम-एमएक्स-६५-२४-१ आरामब २७/०१/२०२५ रोजी १५.०० वाजता सुरू./२७/०१/२०२५ रोजी १५.५० वाजता समाप्त ४. पीएनयु-एनजीपी-डब्ल्यूआर-टीओआय-२०-२४-१ आरंभ २७/०१/२०२५ रोजी १५.०० वाजता/ २७/०१/२०२५ रोजी १६.०० वाजता समाप्त. ५. पीएनयु-एनजीपी-सीडी-टीओआय-२१-२४-१ आरंभ २७/०१/२०२५ रोजी १५.०० वाजता / २७/०१/२०२५ रोजी १६.१० वाजता समाप्त. कॅटलॉग १ पार्किंग-एनजीपी-बीपीक्यू-एमएक्स-७२-२५-२ आरंभ २७/०१/२०२५ रोजी १५.०० वाजता / २७/०१/२०२५ रोजी १५.३० वाजता समाप्त. रेल्वेच्या https://ireps.gov या वेबसाइटवर तपशील

Apex-422 एसीएम(कॉग)/एनजीपी

खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है


# मनपा शालेय क्रीडासत्राचे उदघाटन

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १० :** चंद्रपूर मनपा शाळांमधून गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जात असल्यानेच मोठ्या प्रमाणात शहरातील विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहे. यामुळे या शाळांमधील शिक्षकांना अशैक्षणिक कामांतून मुक्त करून त्यांना फक्त शिकविण्याचेच काम करू द्यावे असे आवाहन आमदार सुधाकर अडबाले यांनी मनपा शालेय क्रीडासत्र, विज्ञान प्रदर्शनी उद्घाटन समारंभ प्रसंगी केले.

चंद्रपूर महानगरपालिका संचालित २७ शाळांचे शालेय क्रीडासत्राचे उदघाटन बुधवार ८ जानेवारी रोजी कोहिनुर क्रीडांगण येथे करण्यात आले. याप्रसंगी आयुक्त विपीन पालीवाल यांनी मनपाच्या शाळांची पटसंख्या वाढल्याचे तसेच विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध व कौशल्यरित्या सादर केलेल्या शो ड्रिलचे कौतुक केले. सदर क्रीडासत्र ३ दिवस चालणार असुन यात १७०० विद्यार्थी सहभागी झाले आहेत.यात खो-खो,कबड्डी,गोळा फेक, रीले रेस, लांब उडी, वैयक्तीक कौशल्य इत्यादी विविध मैदानी खेळ खेळले जाणार आहेत. ३ दिवस विद्यार्थ्यांच्या भोजनाची तसेच मध्यान्हात दुध देण्याची व्यवस्था मनपातर्फे येणार आहे.

महात्मा फुले प्राथ. शाळा, भा. डॉ. भीमराव आंबेडकर शाळा, लोकमान्य टिळक प्राथ. शाळा यांच्यातर्फे शो ड्रील तर पी एम श्री सावित्रीबाई फुले उच्च प्राथ. व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांतर्फे स्वागत गीत व क्रीडा गीत सादर करण्यात आले तसेच लेझीम, बलुन ड्रील, समुह गान प्रस्तुत करण्यात आले. यावेळी . प्रास्ताविक स्वाती बेत्तावार प्रमुख कार्यवाह यांनी केले .संचालन बबिता उईके,प्रविण आत्राम यांनी तर नागेश नीत,प्रशासन अधिकारी यांनी आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी आयुक्त विपीन पालीवाल, शहर अभियंता विजय बोरीकर, सहा. आयुक्त शुभांगी सूर्यवंशी, सहा. आयुक्त अक्षय गडलिंग, सहा. आयुक्त संतोष गर्गेलवार, प्रशासन अधिकारी (शिक्षण) नागेश नित, स्वाती बेत्तावार आदि उपस्थित होते.


# तपोभूमीत घटस्थापनेने थाटामाटात गुंफा यात्रा महोत्सवाला सुरुवात

**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. १० :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या तपोभूमी गोदेडा येथे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी चालू केलेला यात्रा महोत्सव यावर्षी ६५ यात्रा महोत्सवाची सुरुवात घटस्थापनेने थाटामाटात विधिवत पूजा अर्चा करून ९ जानेवारी पासुन सरु झाली.

घटस्थापना आणि सभा मंचाचे उद्घाटन मिथुन गुरनुले आणि विठ्ठल सावरकर यांच्या हस्ते झाली.पहीला पुजेचा मान गुंफा यात्रा महोत्सव समितीचे सदस्य भुषण घनश्याम चाफले आणि त्यांच्या पत्नी स्वाती भुषण चाफले यांना मिळाला.

यावेळी सुधाकर चौधरी महाराज



यांच्या हस्ते विधिवत मंत्रउचाराणे पुजा करण्यात आली.

यावेळी ग्रामगिताचार्य राम राऊत, डॉ शाम हटवादे, नथ्थूजी भोयर, परसराम ननावरे, विलास पिसे, महादेव पिसे, सरपंच गिरजाबाई गायकवाड, ग्रामसेविका मिनाक्षी बोंढेकर, रत्नमाला सोनुले, मंगला डांगे, पुष्पाताई वाढई, प्रविण वाघे, लुटारू सुर्यवंशी, धनराज मेश्राम, चरडे, लोनबले, अक्षय शेन्डे, दिलीप खोब्रागडे बहुसंख्येने गुरुदेव सेवक उपस्थित होते. संकल्प गितानी कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे संचालन भास्कर वाढई यांनी केले.

# तपोभुमीत यात्रा महोत्सवासाठी प्रशासनातील अधिकाऱ्यांचे नियोजन

**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. १० :** चिमुर तालुक्यातील गोंदेडा येथे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या तपोभूमी वर ९ ते १३ जानेवारी पर्यंत गुंफा यात्रा महोत्सवाला सुरुवात झाली असुन १३ जानेवारीला गोपाल काल्याने या तपोभूमी महोत्सवाची सांगता होणार आहे.

विदर्भाची पंढरी म्हणून ओळख असलेल्या या तपोभूमीत हजारो भावीक नतमस्तक होण्यासाठी येतात. या पार्श्वभूमीवर चिमूर पोलिस आणि प्रशासकीय अधिकारी वर्गाने तपोभूमीत येवुन यात्रे संबंधी आढावा घेऊन नियोजन केले.

खांबाडा कडून गोंदेडा कडे येताना उमा नदीवरील पूल अरुंद असल्याने नदी मध्ये दुसरा रपटा बनवणार यामुळे भाविक भक्तांना येता जाताना त्रास होणार नाही.

## यात्रा महोत्सवासाठी पोलीस विभाग सज्ज



चिमूर आगाराच्या बसेस चिमूर नेरी खाबाडा मार्ग गोंदेडा येथील नदी पासून येजा करतील, चिमूर मासळ विहीरगाव मार्ग बसेस वडसी येथील पटाच्या मैदानावर थांबतील तर सिदेवाही पेंढरी केवाडा गोंदेडा या बसेस गुरुदेव विद्यालयाच्या मागच्या बाजूच्या प्रांगणात थांबतील.सुरक्षेच्या दुष्टीनेही पोलिस विभागाकडून नियोजन करण्यात आले.यात्रेत दुकानासाठी नियोजन करण्यात आले.विधुत पुरवठा खंडित होणार नाही याची पुर्व कल्पना विज वितरण विभागाला देण्यात आली. शौचालयाची व्यवस्था, पाणी, अग्निशमन,या सर्व गोष्टींवर नियोजन करण्यात आले.

यावेळी चिमूरचे तहसीलदार राजमाने साहेब, ठाणेदार संतोष बाकल,नेरी चोकीचे चौधरी,सर्वग विकास अधिकारी फुलझेले, आगार प्रमुख पेटकर, आरोग्य अधिकारी,विज वितरणचे अधिकारी, बांधकाम विभागाचे अधिकारी,गुरुदेव गुंफा साधना समीतीचे अध्यक्ष विठ्ठल सावरकर, नथ्थूजी भोयर,प्रा.प्रकाश सोनुले गुंफा यात्रा महोत्सवाचे अध्यक्ष मिथुन गुरनुले, रत्नमाला सोनुले, सरपंच गिरजाबाई गायकवाड , ग्रामसेविका मिनाक्षी बोंढेकर इत्यादी उपस्थित होते.

# भेजगाव येथे उमेदच्या वतीने प्रौढशिक्षण कार्यशाळा

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**मूल, दि. १० :** तालुक्यातील भेजगांव येथे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना अंतर्गत अभिसरण सार्वत्रिकरण प्रकल्पाच्या वतीने एक दिवसीय प्रौढ शिक्षण कार्यशाळा ग्रामपंचायत जुनासरला येथे गुरुवारी घेण्यात आली.

या कार्यशाळेचे अध्यक्ष भेजगांव येथील ग्रामविकास अधिकारी उमेश आकुलवार तर प्रमुख अतिथी म्हणून, पोलीस पाटील शशिकांत गणवीर, जि प शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश निमगडे, कुटुंबश्री एनाआरओ प्रसन्ना विके, अंगणवाडी सेविका निमाताई शेन्डे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष आनंदराव चटारे, राजु कोसरे, विवेकानंद उराडे, जलिद मोहुर्ले उपस्थित होते.

या कार्यशाळेत गावातील



निरक्षर महिलांनी सहभाग नोंदविला. महिलांना प्रोढ शिक्षणाचे महत्त्व समजून सांगत प्रौढ शिक्षणावर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच निरक्षर महिलांना प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी ग्रामपंचायतीच्या वतीने निरक्षर महिलांना बुक व पेन वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन सारीका बावने तर प्रास्ताविक प्रसन्ना विके आभार दिप्ती वाढई हिने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रभाग संघाच्या अध्यक्षा विशाखा गणवीर, एनी सय्यद,जयश्री चौधरी, ज्योती वाढई आदींनी परिश्रम घेतले.


## कार्यालय नगर परिषद, बल्लारपूर

निविदा सुचना क्र.प्रशा/पा.पु.व स्वच्छता वि./नपब/ 7965/2025 दिनांक :- 10/01/2025

### निविदा सुचना

या निविदा सुचनेद्वारे खालील नमुद केलेल्या कामाकरीता दर निश्चीती करणे असल्याने पंजिबध्द कंत्राटदाराकडून प्रपत्र ब-१ मध्ये निविदा मागविण्यात येत आहे खालील कामाची निविदा केवळ निविदा पध्दतीने सादर करावयाची आहे

कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | अनामत रक्कम | निविदा प्रपत्राची किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | स्वच्छ सर्वेक्षण 2024 व माझी वसुंधरा 4.0 अंतर्गत नगर परिषद क्षेत्रातील सार्वजनिक विहिरीमधील गाळ उपसा करणे, सार्वजनिक विहिरी दुरुस्ती करुन लोखंडी जाळी बसविणे बाबतची कामे करणेबाबत. | रु. 4,86,142/- | रु. 5,000/- | रु. 5,00/- |
| २. | नगर परिषद बल्लारपुर स्वच्छता विभागाकरीता नारळी झाडु, लहान पावडे, प्लास्टिक घमेले, विळे व इतर स्वच्छते संबधीत आवश्यक साहीत्य खरेदी करण्याबाबत. | आवश्यकते नुसार | रु.5,000/- | रु. 5,00/- |

**निविदा वेळापत्रक :-**

| | |
|---|---|
| निविदा विक्री / स्वीकृतीचा दिनांक व वेळ | दिनांक : 11/01/2025 ते 22/01/2025 ला सायंकाळी 5:45 वाजे पर्यन्त |
| निविदा उघडण्याची दिनांक व वेळ | दिनांक : 23/01/2025 ला शक्य झाल्यास दुपारी 4:00 वाजता |

➢ **अटी/शर्ती :-**

उपरोक्त कामाचा इतर /अटी शर्ती कार्यालयात पाहावयास उपलब्ध आहे.

स्वा/-
(श्री. विशाल वाघ)
प्रशासक तथा मुख्य अधिकारी
नगर परिषद, बल्लारपूर.

## अवैध होडींग चालकांवर कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १० जानेवारी :** शहरात विना परवानगी होर्डिंग व स्टीकर लावणाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र विद्रुपीकरण कायदा १९९५ व सार्वजनिक संपत्ती नुकसान निवारण अधिनियम १९८४ अन्वये गुन्हा दाखल करण्याबाबत चंद्रपूर महानगरपालिकेच्या तीनही झोन कार्यालयांद्वारे पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे. झोन क्रमांक १ प्रभागात अज्ञात व्यक्तीद्वारे मैत्री विद्यालय, केसरी बोअरवेल नावाने, झोन क्रमांक २ प्रभागात नकुल वासमवार यांनी तर झोन क्रमांक ३ प्रभागात विक्रम शर्मा (डोग्रा ड्राय फ्रुट्स) तसेच कार वॉश सेंटरची जाहिरात करणारे अवैध होर्डींग विविध ठिकाणी तसेच बॅनर- स्टीकर भिंतींवर व विद्युत खांबांवर मनपाकडुन पूर्वपरवानगी न घेता लावले आहे.

## भिसी येथे सावित्रीबाई फुले जयंती

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. १० जानेवारी :** चिमूर समाजोन्नती बहुउद्देशीय संस्था चिमूर द्वारा संचालित कला व वाणिज्य महाविद्यालय भिसी येथे महिला तक्रार निवारण समिती अंतर्गत स्त्री शिकली, धर्म बाटला, पासुन मुलगी शिकली, पगत झाली, असं व्यवस्थेला म्हणायला भाग पाडणारी, स्त्री शिक्षणासाठी स्वत: पिडणारी, आजच्या शिकुन शहाण्या झालेल्या सर्व महिलांना मार्गदर्शक असणारी, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमीत्य कला व वाणिज्य महाविद्यालय भिसी येथे शुकवार ला उत्सव साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ विठ्ठल ठावरी यांनी स्त्री सक्षमीकरण विषयक विचार मांडले.

# मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिलेला शब्द पाळावा

## स्मार्ट मीटर लावण्यात येऊ नये

## कॉंग्रेस तर्फे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनातून मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. १० जानेवारी :** महाराष्ट्रातील महावितरणच्या २.६१ कोटी ग्राहकाकडे स्मार्ट मीटर लावण्याची शासनाची योजना २०२४ ला तयार करण्यात आली होती. पहिल्या टप्प्यात हे मीटर शासकीय कार्यालय तसेच शासकीय वसाहती मध्ये लावण्यात येणार होते. राज्यातील विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळेस राज्याचे तत्कालीन उप - मुख्यमंत्री व वर्तमान मुख्यमंत्री यांनी महाराष्ट्रात स्मार्ट मीटर योजना लागू करण्यात येणार नाही असे जाहीर केले. मात्र चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्घूस येथील ग्राहक महावितरण कार्यालयात ना दुरुस्त मीटर बदलविण्या संदर्भात गेले असता त्यांना सांगण्यात आले की आता हे साधे मीटर बंद झाले असून लवकरच नवीन स्मार्ट मीटर येणार आहे तेच मीटर आपल्याला लावून मिळतील यामुळे महाराष्ट्रात निवडणुका पार पडल्या नंतर व नवीन सरकार सत्तेत आल्यानंतर परत एकदा महाराष्ट्राच्या नागरिकांच्या मानगूटीवर गुपचूपपणे हे स्मार्ट मीटर बसविण्याचे प्रयत्न होत असल्याचे निरदर्शनास येताच कॉंग्रेस अध्यक्ष राजुरेड्डी व पदाधिकाऱ्यांनी ९ जानेवारी २०२५ रोजी जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन चंद्रपूर जिल्ह्यात स्मार्ट मीटर लावण्यात येऊ नये अशी मागणी केली.



चंद्रपूर जिल्हा हा औद्योगिक जिल्हा असून येथे ठेकेदारी मजूर, शेत मजूर व छोटे व्यापारी यांची संख्या खूप मोठी असून ठेकेदारी कर्मचाऱ्यांना दोन - दोन महिने पगार मिळत नाही. सध्या नागरिक दोन महिन्याचे बिल अतिरिक्त करा सहित भरतात मोबाईल रिचार्ज प्रमाणे विज बिल भरणे हे सर्वसामान्य नागरिकांना खूपच त्रासदायक ठरणार आहे.

विज ही मानवी जीवनातील मूलभूत गरज असल्याने शासनाने नागरिकांना अंधारात ठेवण्याचा षडयंत्र करू नये व मुख्यमंत्र्यांना दिलेला शब्द पाळावा अशी मागणी कॉंग्रेसने निवेदनातून केलेली आहे

याप्रसंगी कॉंग्रेस नेते सैय्यद अनवर, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष रोशन दंतलवार, रोहित डाकूर, सुनील पाटील व पदाधिकारी उपस्थित

## घनश्यामजी पिसे कृषी संशोधन केंद्रात मशरूम लागवड व विक्री सहाय्य कार्यशाळा

**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. १० जानेवारी :** चिमूर तालुक्यातील कोलारा गेट सातारा येथील घनश्यामजी पिसे कृषी संशोधन केंद्रात रविवार दि. १२ जानेवारीला एक दिवसीय मशरूम लागवड व विक्री सहाय्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे.

चिमूर विधानसभेत शेतकरी व बेरोजगारी यांची समस्या अतिशय बिकट आहे, यावर उपाय म्हणून कोलारा गेट सातारा येथे घनश्यामजी पिसे कृषी संशोधन केंद्राची स्थापना करण्यात आली असून याअंतर्गत नवनवीन प्रकल्प राबविण्यात येत असतात. शेतीमध्ये भातपिकातून तयार झालेली तनस, कोंडा व कुटार यांचा वापर करून मशरूम चे उत्पादन घेतले असता शेतकऱ्यांना घरीच भरघोस आर्थिक उत्पन्न घेता येते, यासाठी मशरूम ची लागवड कशी करायची, तयार झालेले मशरूम बाजारपेठेत कुठे व कशे विकायचे यावर तज्ञांचे मार्गदर्शन दिले जाणार आहे व उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचे मशरूम विक्री साठी नोंदणी करण्यात येणार असून प्रशिक्षणानंतर शेतकऱ्यांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात येईल. या संधीचा शेतकरी व होतकरू युवक यांनी लाभ घ्यावा असे आवाहन मुख्य प्रवर्तक प्रा. डॉ. अजय पिसे यांनी केले.

# अड्याळ टेकडीवर तत्वहीन व बेईमान लोकांची दहशत

## पोलिसांनी त्यांच्यावर कडक कारवाई केली, अड्याळ टेकडी सेवक दाभेकर यांची माहिती



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १० जानेवारी :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या आदेशानुसार, तुकाराम दादा गीताचार्य यांनी ग्रामगीतेच्या ३९व्या अध्यायानुसार २००६ पर्यंत अड्याळ टेकडीवर भू-वैकुंठाचा प्रयोग यशस्वीरित्या सुरू केला होता. तुकाराम दादानंतर तथाकथित ब्रह्मचारी, तथाकथित पूर्णपणे समर्पित, तत्वहीन लोक, स्वतःच्या स्वार्थासाठी राष्ट्रीय संत आणि तुकाराम दादांचे श्रद्धास्थान असलेल्या अड्याळ टेकडी येथे येणाऱ्या भक्तांना लुटण्याचे काम करत आहेत. ढोंगी लोकांनी टेकडीला उपजीविकेचे साधन बनवले आहे. यादरम्यान सेवक सारंग दाभेकर यांनी टेकडी येथील नव्याने बांधलेल्या प्रवासी निवासस्थानाची तोडफोड करून तेथून साहित्य चोरल्याचा आरोपही केला आहे. पोलिसांनी या विरोधात कारवाई करत आरोपीला ताब्यात घेतल्याची माहिती दिली.

दाभेकर म्हणाले की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि तुकाराम दादांनी अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम मोजरी रजिस्टर क्रमांक एफ १६२ नावाची संस्था स्थापन केली. या संघटनेचा एक भाग म्हणून तुकाराम दादांनी २००६ पर्यंत निःस्वार्थपणे गुरुदेव सेवा मंडळाच्या कार्यात स्वतःला समर्पित केले आणि अड्याळ टेकडीच्या गुरुदेव भक्तांना मौन ध्यान आणि अध्यात्माचे ज्ञान दिले. स्वावलंबन आणि कर्मयोग तसेच प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून मौन ध्यानाचा अभ्यास केल्यानंतर, मौन साधकांनी श्रमदानाच्या मदतीने पंढरपूरमधील टेकडी मोझरी येथे गुरुकुल आणि ग्राम गीता तत्वज्ञान अकिरा दर्शन मंदिर हे आध्यात्मिक कार्यस्थळ बांधले. दादांच्या कारकिर्दीनंतर, टेकडीवरील कामगारांमध्ये दोन गट निर्माण झाले.

त्यांच्यापैकी एक गट जो टेकडीच्या कामात निःस्वार्थपणे तन, मन आणि पैसा देऊन योगदान देत होता. संघटनेचे आजीवन सदस्य बनून त्यांनी टेकडीवर आपले काम सुरू ठेवले. परंतु दुसऱ्या गटाने, तथाकथित ब्रह्मचारी आणि भक्तांनी, वैयक्तिक फायद्यासाठी मुख्य संघटनेविरुद्ध बंड केले आहे आणि मनमानीपणे न्यायालयीन खटले सुरू केले असल्याचा आरोप दाभेकर यांनी केला.

यामध्ये, उच्च न्यायालय नागपूर ने दुसऱ्या गटाची अपील फेटाळून लावले आणि अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम मोझरी संस्थेच्या बाजूने निकाल दिला.

अपयशामुळे संतप्त झालेल्या दुसऱ्या गटाने टेकडीवरील मुख्य संघटनेच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या गटाला त्रास देणे आणि धमक्या देणे सुरू केले.

कथित ब्रह्मचारी आणि अप्रामाणिक लोकांवर टेकडी येथील यात्रा रहिवाशांचे साहित्य आणि साहित्य चोरणे, रात्री गावातील गुंडांवर हल्ला करणे आणि वृद्धांना मारहाण करणे, गावातील गुंडांनी करत असलेल्या नवीन बांधकामाची तोडफोड करणे असे अनेक गुन्हेगारी गुन्हे केल्याचा आरोप दाभेकर यांनी केला आहे.

या संदर्भात ब्रह्मपुरी पोलिसांकडे तक्रार केल्यानंतर पोलिसांनी संबंधित व्यक्तींविरुद्ध गुन्हा नोंदवून कठोर कारवाई करणार असल्याचे सांगितले. दुसरा गट राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि कर्मयोगी तुकाराम दादांच्या मुख्य संघटनेविरुद्ध भक्तांची दिशाभूल करत आहे.

सेवक दाभेकर यांनी पत्रकार परिषदेत आरोप केला की दुसऱ्या गटाने चुकीची माहिती असलेले भडकाऊ पत्रके छापून मुख्य संघटनेविरुद्ध चुकीची माहिती पसरवण्यास सुरुवात केली आहे.

अड्याळ टेकडीच्या नावाखाली लुटमार करून स्वतःचे पोट भरण्यात गुंतलेल्या स्वार्थी आणि बेईमान लोकांचा हेतू ओळखून गुरुदेव भक्तांनी सर्वस्वी सेवक, पत्रपरिषदे द्वारे अड्याळ टेकडीच्या आध्यात्मिक ठिकाणी शांतता, सुव्यवस्था आणि पावित्र्य राखण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन सारंग दाभेकरने केले आहे.

# खंजेरी भजन स्पर्धा



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**सावली, दि. १० जानेवारी :** मौजा-अंतरगाव येथे अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ आणि समस्त गावकरी यांच्या संयुक्त विद्यमाने वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ५६ व्या पुण्यस्मरण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवाचा मुख्य आकर्षण होता भव्य खंजेरी भजन स्पर्धा, ज्यामध्ये ३१ स्पर्धकांनी सहभाग घेतला.

माजी खा. नेते यांनी आपल्या विचारात सांगताना धर्म, संस्कार, आणि राष्ट्रनिर्मितीचे संदेश या शब्दाचा उल्लेख केला. या कार्यक्रमाला माजी खासदार तथा भाजपा अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री अशोक नेते यांनी प्रमुख उपस्थिती लावली. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी धार्मिक कार्यक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडत असल्याचा उल्लेख केला. त्यांनी म्हटले, 'धार्मिक व आध्यात्मिक उपक्रम केवळ संस्कारच नव्हे, तर देश व समाजाच्या उभारणीसाठीही महत्त्वाचे आहे. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांवर आधारित असे उपक्रम आजच्या काळात अत्यंत गरजेचे आहेत.'

अंतरगावावरील आपले प्रेम व्यक्त करताना त्यांनी या गावासाठी सभामंडप बांधून दिल्याचे नमूद केले. गावकऱ्यांनी पुढे आणलेल्या समस्या सोडविण्याचे आश्वासन देत, कार्यक्रमात सहभागी होणे हे आपले भाग्य असल्याचे त्यांनी सांगितले. 'गुरुदेवांचे दर्शन व या पवित्र कार्यात सहभागी होण्याचा योग लाभणे, ही माझ्यासाठी आनंदाची गोष्ट आहे,' असेही ते म्हणाले.

या खंजेरी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाचे श्रेय गुरुदेव सेवा मंडळाला जाते. या स्पर्धेचे संचालन जितेंद्र मस्के यांनी करताना सांगितले की, 'गेल्या पाच वर्षांपासून ही खंजेरी भजन स्पर्धा अंतरगावात सातत्याने होत आहे. दरवर्षी अशोकजी नेते साहेबांची उपस्थिती व सहकार्यानेच या कार्यक्रमाला गती मिळत असते. स्पर्धेला उपस्थित राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने गुरुदेवांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्याचे काम केले आहे. या प्रसंगी माजी नगरसेवक श्रीकांतजी भुगुवार, भाजपा तालुका अध्यक्षा व गुरुदेव मंडळाच्या सचिव छायाताई चकबंडलवार, नियोजन समिती सदस्य जितेंद्र मस्के, चंद्रशेखर काचीनवार, लीलाधर नागोसे, गणेश शेट्टीवार, राहुल बोरकुटे यांच्यासह गावातील गुरुदेव भक्त उपस्थित होते.

# आजपासून वरोरा शहरात अखिल भारतीय खासदार चषक कबड्डी स्पर्धा



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**वरोरा, दि. १० जानेवारी :** स्वर्गीय खासदार बाळू धानोरकर स्मृती प्रित्यर्थ अखिल भारतीय खुले खासदार चषक पुरुष व महिलांच्या कबड्डी स्पर्धा १० ते १२ जानेवारी दरम्यान जय हिंद क्रीडा मंडळ वरोऱ्याच्या जुनी कॉटन मार्केट मैदानावर आयोजित करण्यात आले आहे.

जय हिंद क्रीडा मंडळ वरोऱ्याच्या तिने खासदार चषक अखिल भारतीय खुले कबड्डी सामने मॅटवर खेळवले जाणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन १० जानेवारीला सायंकाळी सात वाजता माजी मंत्री शिवाजी मोघे यांच्या हस्ते केले जाणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार प्रतिभा धानोरकर राहणार असून यावे आमदार सुधाकर अडबाले व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहे. स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी ११ जानेवारीला सायंकाळी सात वाजता मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार आहे. १२ जानेवारीला सायंकाळी सात वाजता महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष आमदार नानाभाऊ पटोले यांच्या हस्ते स्पर्धेचे बक्षीस वितरण केले जाणार आहे. यावेळी खासदार प्रतिभा धानोरकर चंद्रपूर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुभाष धोटे, आमदार अभिजीत वंजारी, इतर मान्यवर उपस्थित राहणार आहे

सदर स्पर्धेत भारतातील पुरुष व महिलांचे नामांकित संघ सहभागी होणार आहे. पुरुष व महिलांमध्ये प्रथम द्वितीय तृतीय येणाऱ्या संघास रोख रक्कम व चषक दिले जाणार आहे. पुरुषामध्ये स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडू बुलेट, महिला उत्कृष्ट खेळाडू यांना स्कुटी दिल्या जाणार आहे

या स्पर्धेचा वरोरा परिसरातील पुरुष व महिलांनी आनंद घ्यावा असे आवाहन जय हिंद क्रीडा मंडळाचे अध्यक्ष प्रवीण काकडे, सचिव काशीब खान आदी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे

# अडेगाव (देश) येथे आधारभूत धान खरेदी केंद्राचा शुभारंभ



**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. १० जानेवारी :** चिमुर तालुक्यातील अडेगाव (देश) येथील आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या. र. नं. ८०७ या संस्थेमध्ये आधारभूत धान खरेदी केंद्राचा शुभारंभ ९ जानेवारीला संस्थेचे सभापती दामोदर ढोणे तसेच संचालक मंडळ यांच्या हस्ते करण्यात आला.

प्रथम धान उत्पादक शेतकरी रवींद्र सखाराम मेश्राम यांचा संस्थेच्या वतीने शाल टोपी पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सभापती दामोदर ढोणे, उपसभापती अंकुश डाहुले संस्थेचे संचालक लटारु सूर्यवंशी, नामदेव दडमल, उद्धव श्रीरामे, मन्साराम जीवतोडे, प्रकाश मगरे, विवेक रामटेके, रमेश आत्राम, गणेश सावसाकडे, सुनंदाबाई नन्नावरे, जनाबाई धारणे तसेच संस्थेचे प्र. व्यवस्थापक श्री निलेश सोनवाने, राकेश देहारे ऑपरेटर, प्रमोद चौधरी, विक्रेता हमाल प्रमुख सुभाष रंदये, भाऊराव चौखे, भाग्यवान चौधरी, अमोल दडमल, कुसमाकर चौधरी, भाष्कर चौधरी, दशरथ चौधरी, गुरुदास मुरकुटे, राकेश मानकर, शेतकरी उपस्थित होते.

# वरोऱ्यात व्हिडिओ गेम पार्लर वर धाड

## दिड लाखाचा मुद्देमाल जप्त, पाच जणाविरुद्ध गुन्हा

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**वरोरा, दि. १० जानेवारी :** वरोरा शहरात मागील काही वर्षापासून इलेक्ट्रिक व्हिडिओ गेम पार्लर द्वारे जुगार खेळल्या जात होता. वरोरा पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाने धाड टाकून मशीन व रोख रकमेसह एक लाख ४५ हजार ९८० रुपयाचा ऐवज जप्त करीत पाच व्यक्तीवर गुन्हे दाखल करण्यात आले.

वरोरा शहरात बाजार परिसरातील इलेक्ट्रिक व्हिडिओ गेम पार्लर द्वारे जुगार खेळत असल्याची माहिती वरोरा पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकास मिळाली. त्या ठिकाणी धाड टाकण्यात आली.

यामध्ये प्रमोद शालिराम पिंपळकर राहणार सुभाष वॉर्ड वरोरा. सागर करलुके, विलास नेरकर, विजय देविदास जाधव, यांच्याकडून एक लाख ४५ हजार ९८० रुपयाचे साहित्य व रोख रक्कम जप्त करीत गुन्हा नोंदविण्यात आला.

ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी नयोमी साटम, यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक अजिंक्य तांबडे, गुन्हे शोध पथकाचे उपनिरीक्षक दीपक ठाकरे यांनी केली या कारवाईने वरोरा शहरात सर्व त्र चर्चा होताना दिसत आहे.

# आयुध निर्माणी प्रवेशद्वारासमोर माजी मुख्यमंत्री मा. सा. कन्नमवार यांचा पूर्णाकृती पुतळा उभारावा



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. १० जानेवारी :** आयुध निर्माणी चांदा नागपूर-चंद्रपूर मार्गावरील भद्रावती चेक पोस्ट मुख्य प्रवेशद्वारा समोर माजी मुख्यमंत्री मारोतराव कन्नमवार यांच्या पूर्णाकृती पुतळा उभारावा अशी मागणी गेल्या अनेक वर्षापासून होत आहे.

आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या अल्पकाळात त्यांनी येथील आयुध निर्माणीची स्थापना करून जिल्ह्यात औद्योगिकरणाचा पाया रचला.

आता या जिल्ह्यात जन्मलेले आणि बालपण घालविलेले देवेंद्र फडणवीस महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री आहेत. ते कन्नमवार यांच्या पुतळ्याच्या उभारणीत पुढाकार घेतील अशी आशा मा.सा.कन्नमवार यांचे प्रेमी करीत आहे.

दि.१० जानेवारीला त्यांची शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती साजरी होत आहे. १९६२-६३ या एक वर्षाच्या अल्पकाळात त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या विकासाचा पाया रचला. त्यात त्यांनी कृष्णा-गोदावरी पाणी वाटप, कोकण रेल्वे, राज्याचे कामकाज मराठीतून करणे, ठाणे खाडी प्रकल्प, चीन युद्धानंतर राज्यात संरक्षण प्रकल्पांची निर्मिती.

त्यातूनच भद्रावती शहरात संरक्षण साहित्य उत्पादन प्रकल्पाचा आयुध निर्माणी हा प्रकल्प उभारला. या जिल्ह्यात जन्मलेल्या मा.सा.कन्नमवार यांचे कर्तृत्व पुढील पिढीला सतत प्रेरणा देत रहावे या उद्देशाने त्यांच्या पूर्णकृती पुतळ्याची उभारणी करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षापासून केल्या जात आहे. ही मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पूर्ण करतील अशी आशा त्यांच्या प्रेमींनी व्यक्त केली आहे.

# वरोरा तालुक्यात अवैध रेती तस्करी



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**वरोरा, दि. १० जानेवारी :** वरोरा तालुक्यातील सर्वत्र नदी घाटावर, नाल्यावर रेती तस्कराकडून अवैद्य रेतीची उचल वाहतूक सर्रास पणे दिवस-रात्र सुरू आहे. या रेती तस्करावर वनविभागाच्या अधिकाऱ्याचे, महसूल विभागाचे तहसीलदार नायब तहसीलदार, तलाठी पोलीस प्रशासनाकडून कोणतीही कठोर कारवाई होत नसल्याने प्रशासनाचे अधिकारी मौनी बाबा झाल्याचे दिसून येते.

तालुक्यातील सहा ते सात किलोमीटर अंतर असलेल्या करंजी या गावातून वाहणाऱ्या वर्धा नदीच्या पात्रात लाखो ब्रास रेती साचलेली आहे. साचलेल्या या रेतीवर लाखो रुपयाचा महसूल हे रेती तस्कर लुटत असल्याने या नदीत मोठ मोठे खड्डे पडलेले आहे. यावर अंकुश लावण्यास पोलीस प्रशासन महसूल विभागाचे अधिकारी अ समर्थ ठरित आहे. एवढेच नव्हे तर रेती तस्करांनी लाखो ब्रास रेती गिळंकृत केल्याने रेती तस्कर निर्धास्त झाले. रेती तस्करावर कोणतीही कारवाई होताना दिसत नाही.


नदी घटाच्या परिसरातील काही भाग हा वन विभागाच्या अखत्यारीत येत असतो काही दिवसा अगोदर खूप जोर लावून पोलीस प्रशासनाने आठ ते दहा ट्रॅक्टर वर कारवाई केली होती. ही कारवाई मात्र चालढकल असल्याची चर्चा नागरिकात प्रसार माध्यमावर पाहायला मिळत आहे.

एरवी काही ट्रक चालक मालक यांच्या गाड्यावर कारवाई करताना तहसील विभाग आरटीओ विभाग यांना लेखी पत्रकार द्वारे कळविण्यात येऊन या गाड्यावर ओव्हरलोड की महसूल विभागाची मोठी कारवाई करण्या स पोलीस अधिकारी महत्त्वाची आपली भूमिका मांडताना दिसतात परंतु आता या रेती चालक ट्रॅक्टर वर अशा प्रकारे ठोस कारवाई करण्यात न आल्याने संपूर्ण प्रशासन मौनी बाबा झाल्याचे दिसून येते.

# न्यू इंडिया कॉन्व्हेंट येथे 'टिंकर एक्सप्रेस' कार्यशाळा

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १० जानेवारी :** न्यू इंडिया कॉन्व्हेंट हायस्कूल, तुकूम येथे २६ अल्फाबेट लॅब अ‍ॅन्ड एज्यूकेशन प्रा. लिमी यांच्यातर्फे 'टिंकर एक्सप्रेस' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



यात इयत्ता पाचवी ते सातवीचे विद्यार्थी तथा विज्ञान-गणित शिक्षकांनी अद्ययावत तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. 'टिंकर एक्सप्रेस' कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांना स्टेमविषयांबद्दल जागरूक करणे आणि त्यांना भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तयार करणे हा होता. कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी पहिल्या ॲपची निर्मिती करणे, स्वत: सर्किट तयार करण्यासोबतच तीन प्रिंटिंग आणि व्हर्चुअल रिअलिटीचा अनुभव घेतला. कार्यशाळेत विद्यार्थ्यांची सर्जनशीलता आणि कल्पकतेला चालना मिळाली. एक दिवसीय कार्यशाळेत ३० हून अधिक विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेने विविध गोष्टी आत्मसात करून तंत्रज्ञानावर आधारीत वस्तू तयार केल्या. शिक्षकांसाठी देखील हा अनोखा अनुभव ठरला. त्यांनी स्टेम शिकवण्याच्या सोप्या पद्धती जाणून घेतल्या. यावेळी विद्यार्थी विविध अनुभव कथन करून कार्यशाळेमुळेच आम्ही आमचे पहिले ॲप तयार करू शकलो, असा अनुभव विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

# सदगुरु जगन्नाथ बाबा शिक्षण महाविद्यालयात भावी शिक्षकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**कोरपना, दि. १० जानेवारी :** गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली सलगणित नांदा येथील सदगुरु जगन्नाथ बाबा शिक्षण महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या छात्र अध्यापकांसाठी त्यांच्यामध्ये असलेल्या सुप्त कलागुणांना व नेतृत्वगुणांना वाव मिळावा हा उद्देश समोर ठेवत अभ्यासक्रमाच्या मांडणी नुसार एकल गीत गायन समूहगीत गायन ऑनलाइन शिक्षण हे तारक की मारक या विषयावर वादविवाद तसेच समाजातील व्यंगात्मक बाबी समोर याव्या यासाठी एकपात्री प्रयोग अशा अनेक स्पर्धा सोबतच टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनवणे व आपल्या व्यवसायाशी प्रामाणिकपणा जोपासण्याबद्दल पाठाच्या पायऱ्या अशा स्पर्धा घेण्यात आल्या यावेळी एकूण प्रथम वर्षाला असलेले ५० छात्र अध्यापक व अध्यापिका प्रामुख्याने उपस्थित होत्या या कार्यक्रमाकरिता अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव प्राचार्य डॉक्टर अनिल मुसळे गुरुकुल कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य आशिष पैनकर व स्पर्धेदरम्यान परीक्षक म्हणून प्राध्यापक प्रशांत पुराणिक प्रमोद वाघाडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन छात्र अध्यापिका संगीता वाबिटकर तर आभार रुपेश चौधरी यांनी मानले.

# कुंभ स्नानासाठी जाणाऱ्या भाविक भक्तांचा भाजपतर्फे सत्कार



**महासागर प्रतिनिधी**

**भोयेगाव, दि. १० जानेवारी :** कुंभमेळा हा हिंदू धर्मातील एक महत्त्वाचा सण आहे. कुंभमेळ्यात कोट्यवधी भाविक एकत्र जमतात आणि नदीत स्नान करतात. तब्बल १२ वर्षानंतर महाकुंभाचे आयोजन करण्यात आले आहे. कुंभमेळा भारतातील केवळ चार पवित्र नद्या आणि चार तीर्थक्षेत्रांवर भरतो. प्रयागराज, हरिद्वार, नाशिक आणि उज्जैन येथेच महाकुंभाचे आयोजन केले जाते. १४ जानेवारी २०२५ मकर संक्रांतीच्या शुभमुहूर्तावर होणाऱ्या शाही स्नानासाठी गडचांदुर येथील २० महिला व पुरुष भाविक-भक्त मित्रमंडळी महाकुंभ, काशी विश्वनाथ अयोध्या यात्रेसाठी निघाले आहे. या निमित्ताने गडचांदूर शहर भारतीय जनता पक्षाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करून यात्रा सुखमय, सफल व्हावी यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी कोरपना तालुका भाजपा संघटन महामंत्री सतीश उपलेंचवार, भाजपा शहराध्यक्ष अरविंद डोहे, राकेश अरोरा, शंकर शिरसागर, पवन यादव, सर्वेश्वर चिद्दरवार, अशोक झाडे इतरांची उपस्थिती होती.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर

मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक

मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ * स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

